# अमरावती शहर  दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक  २४/०१/२०२४

➢ गैरकायदयाची मंडळी जमविणे :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो स्टे बडनेरा अप क्र ३३/२४ कलम १४३ १४७ १४८ १४९ ३२४, ,५०६ब ५०४ भादवी | अलमास ग्राउंड जुनी वस्ती बडनेरा | दि.२०/०१/२०२४ वा चे रात्री २३/३० वा दि.२३/०१/२०२४ चे १९/५६ वा | शेख अतीक शेख शफी वय-२७वर्ष रा. मोती नगर जुनी वस्ती बडनेरा | १. सयद अजीम ऊर्फ अज्जु वय-३८ वर्ष २. अब्दुल इमरान वय-३२ वर्ष ३. शेख रेहान वय-२२ वष ४. अब्दुल मुक्तार वय-३० ५. सयद अनिस उर्फ अन्या वय -३० वर्ष ६. असलम वय-२५ वर्ष सर्व रा. चमन नगर जुनी वस्ती बडनेरा | हकीकत अशप्रकारे आहे की, शेख अतीक शेख शफी  वय-२७ वर्ष रा. मोती नगर जुनी वस्ती बडनेरा समक्ष विचारले वरुन सांगतो की वरील पत्यावर राहतो व विटाभटटीचा व्यवसाय करतो. अलमास ग्राउंड जुनी वस्ती बडनेरा येथे क्रिकेट सामने सुरु असुन ते पाहण्याकरीता मी व  माझे मित्र मो. तोसीफ मो हारुन वय-२७ वष गेलो होतो तेव्हा २०.०१.२०२३ चे रात्री २१.०० वा क्रिकेट खेळणेचे डिसीजन वरुन वाद होवुन भांडण सुरु होते भांडण सोडविण्याकरीता मी व माझा मित्र तौसीफ गेलो असता तेथे त्यांचे भांडण मिटले अचानक तेथे सयद अजीम ऊर्फ अज्जु वय-३८ वर्ष हा माझे  समोर आला व मला पिस्टल दाखवीली मी घाबरलो त्यांनी मला ग्राउंड जवळील दवाखान्याचे भिती समोर नेले व म्हटले तु ज्यादा हुशार हो गया क्या असे बोलुन शिवीगाळ करु लागला त्याचे पाठोपाठ त्याचा भाउ २. अब्दुल इमरान वय-३२ वर्ष हा हातात तलवार घेवुन आला ३. शेख रेहान वय-२२ वष हा लोखंडी रॉड घेवुन आला ४. अब्दुल मुक्तार वय-३० हा लोखंडी पाईप घेवनु आला  ५. सयद अनिस उर्फ अन्या वय -३० वर्ष यांचे हातात लोखंडी रॉड फडसा लागलेला ६. असलम वय-२५ हातात लोंखडी पाईप असे घेवुन सर्व रा जुनी वस्ती बडनेरा त्या संवानी मला व तौसीफ ला  शिवीगाळ करुन मारण्याची  धमकी देत पाईपने मारहाण केली. अनुने माझे डोक्यावर फडशा असलेला पाईप मारला त्यामुळे माझे डोक्याला जखम होवुन रक्त निघले इतरांनी मला व तौसीफला पाईपने डाव्या हातावर मारहाण केली त्यांनंतर मला तौसीफने व इतर मुलाने पोस्टै बडनेरा व सामान्य रुग्ण्यालय येथे नेले सध्या रेडीयंट हॉस्पीटल येथे भरती आहे मला आज चांगले वाटत असल्याने मी पोलीसांना बयान देत आहे अशा जबानी रि वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ दुखापत :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | पोस्टे वलगाव 27/2024 कलम324, 323, 504, 506 , 34भादवि | वार्डनं.01 शिराळा ता.जि. अमरावती | दिनांक 22/01/2024 रोजीरात्री 20/30 वा दरम्यान दाखल दि.23/01/2024 चे 01/10 वा. | अक्षय यशंवतराव गोंडेकर वय 29 वर्ष व्यवसाय सरकारी नोकरी (फौजी) रा. वार्ड नं.01 शिराळा ता.जि.अमरावती | 1) संदीप विश्वासराव गोंडेकर वय 35 वर्ष 2) निलेश विश्वासराव गोंडेकर वय 33 वर्ष दोन्ही रा रा. वार्डनं. 01 शिराळा ता.जि.अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि,दिनांक 22/01/2024 रोजी रात्री 08/30 वा दरम्यान मी गावातील राममंदीर येथे प्रसादचे वाटप करीत असतांना माझे मोबाईलवर माझी महिला नातेवाईक यांनी फोन करुन सांगीतले की, संदीप विश्वासराव गोंडेकर वय 35 वर्ष व निलेश विश्वासराव गोंडेकर वय 33 वर्ष हे दोघेही दारु पिलेले असुन आपले घरावर येत असुन त्याचे हाता मध्ये फर्शी असुन शिवीगाळ करीत आहे. असे सांगील्यावरुन मी माझे घरा जवळ गेलो असता संदीप विश्वासराव गोंडेकर वय 35 वर्ष रा. शिराळा हा माझे महिला नातेवाईक यांना थापडा बुक्यांनी मारहाण करीत होते व शिवीगाळ करीत होते .मी संदीपला म्हटले की, तु का शिवीगाळ करीत आहे. असे का विचारले याकारणावरुन मला निलेश गोंडेकर यांनी पकडुन ठेवले व संदिप गोंडेकर याने त्याचे हातातील फर्शी माझे डोक्यात व ओटाला मारल्याने डोक्यातुन व ओटातुन रक्त निघुन जखमी केले व शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिली. तसेच त्यानंतर संदिप गोंडेकर याने तिच फर्शी त्याचा भाउ निलेश गोंडेकर यांचे डोक्यात मारुन त्याला जखमी केले व त्याचे डोक्यातुन रक्त निघुन त्याला सुध्दा जखमी केले. तेथे असलेले मनिष खेरडे व धंनजय यशंवतराव गोंडेकर यांनी आमचे भांडण सोडविले. त्यांनंतर मी मनिष खेरडे यांचे सोबत पो.स्टे.ला रिपोर्ट देण्याकरीता आलो मला संदिप गोंडेकर व निलेश गोंडेकर यांनी माझे डोक्यावर फर्शी मारुन जखमी केले व माझे महिला नातेवाईक यांना व मला थापडा बुक्यानी मारहाण करुन शिवीगाळ केली व मारण्याची धमकी दिली तरी त्याचे वर योग्यती कारवाई व्हावी करीता रिपोर्ट देत आहे. अशा लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०३ | पोस्टे वलगाव अप. 28/2024 कलम 324,323, 504, 506 , 34 भादवि | वार्डनं.01 शिराळा ता.जि. अमरावती | दिनांक 22/01/2024 रोजीरात्री 20/30 वादरम्यान दाखल दि.23/01/2024 चे 02/33 वा. | निलेश विश्वासराव गोंडेकर वय 33 वर्ष व्यवसाय मजुरी रा.तिगाव तहसिल पांढुर्णा जि.छिंदवाडा (म.प्र) | 1) मनिष राजेंद्र खेरडे वय 21वर्ष, 2) धनंजय यशवतंराव गोंडेकर वय 30 वर्ष, 3) यशवतंराव तुकामरावजी गोंडेकर वय 58 वर्ष, 4) अक्षय यशंवतराव गोंडेकर वय 29 वर्ष सर्व रारा. वार्ड नं.01 शिराळा ता.जि.अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की दिनांक 22/01/2024 रोजी रात्री 08/30 वा दरम्यान मी घरी हजर असतांना घराचे बाहेर माझा मोठा भाऊ संदिप विश्वासराव गोंडेकर हा ऊभा असतांना त्याला अक्षय यशवंतराव गोंडेकर वय 29 वर्ष रा. शिराळा हा माझे भावाला जुने भांडाणाचे कारणा वरुन शिवीगाळ व थापडा बुक्यांनी मारहाणा करीत असल्याचा मला जोरजोराने आवाज आला मी घराचे बाहेर आलो तेव्हा माझे भाउ संदीप गोंडेकर याला मनिष राजेंद्र खेरडे वय 21 वर्ष, धनंजय यशवतंराव गोंडेकर वय 30 वर्ष, यशवतंराव तुकामरावजी गोंडेकर वय 48 वर्ष, या तिघांनी माझे मोठे भाउ संदिप गोंडेकर याला पकडुन ठेवले त्यामुळे मी माझे भावाला त्याचे तावडीतुन सोडण्या करीता करीता गेलो असता अक्षय यशंवतराव गोंडेकर वय 29 वर्ष याने त्याचे हातातील फर्शीने माझे डोक्यावर जोरात मारल्याने माझे डोके फुटुन रक्त निघत होते. त्याने मला माझे माझे महिला नातेवाईक यांना सुध्दा शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिली. तेव्हा माझी महिला नातेवाईक यांनी 112 डायल वर फोन करुन माहीती दिली. त्यानंतर लगेच थोडया वेळाने 112 डायलची गाडी आली व त्यांनी आम्हाला गाडीत बसवुन पोलीस स्टेशनला रिपोर्ट देण्यास घेवुन आले मनिष राजेंद्र खेरडे वय 21 वर्ष, धनंजय यशवतंराव गोंडेकर वय 30 वर्ष, यशवतंराव तुकामरावजी गोंडेकर वय 58 वर्ष,रा. ग्राम शिराळा ता.जि.अमरावती यानी माझे भावाला पडकडुन ठेवल्याने माझे मोठे भाला सोडण्या करीता गेलो असता अक्षय यशंवतराव गोंडेकर याने त्याचे हातातील फर्शी माझे डोक्यावर मारू मला जखमी केले व माझे महिला नातेवाईक यांना शिविगाळ करुन मारण्याची धमकी दिली त्याचेवर योग्य कारवाई व्हावी करीता रिपोर्ट देत आहे. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट व मेडि. सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ वाहन चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती<br><br>अपक्र. ९१/२४ कलम-३७९ भादवी | अवस्थी इग्लिंश क्लासेस समोर गाडगे नगर अमरावती | गु.घटना ता व वेळ दि.१८.१..२०२४ चे २०.२० वा<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ दि.२३.१.२०२४ चे १७.३९ वा | दर्शन अरुणराव जावरकर वय २७ वर्ष.राकल्याण नगर अमरावती | अज्ञात इसम | हकिकत अशा प्रकारे आहे की,घ ता वेळी व ठिकाणा यातील फिर्यादी ट्युशनकरिता त्याची होन्डा एक्टिव्हा क्र एम एच २७ सी एस १४८२ रेग निळा कि अं ५०००० रु ची क्लासेस समोरुन ठेवली अशता कोणीतरी अज्ञात इसमाने चोरुन नेली .अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ प्राणांकिंत अपघात :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | मृतकचं नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो स्टे खोलापुरी गेट १८/२०२४कलम २७९,३०४,(अ) भादवि | अमरावती ते भातकुली रेल्वे फॉंईटका समोर सारकर वाडी समोर | दि २३.०१.२०२४ चे १३.१० वा<br>दाखल - २३.०१.२०२४- चे १९/३५ वा. | नंदु वामनराव गाडे वय ४९ वर्ष धंदा- ड्रायव्हर रा. हरताळा ता.भातकुली जि.अम | (मृतक) शेख अहमद शेख उमेद वय ४३ वर्ष रा.शरद पवार नगर भातकुली ता.भातकुली जि.अम. | (मृतक) शेख अहमद शेख उमेद वय ४३ वर्ष रा.शरद पवार नगर भातकुली ता.भातकुली जि.अम. | सदर गुन्ह्याची हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील ट्रक क्रंमाक एम एच.बी.एक्स ०२०४ चा चालक हा मनपाचा कचरा घेवुन कचरा डेपो येथे गेला व कचरा टाकुन परत येतांना सावरकर याचे वाडी समोर ट्रक उभा करुन रस्त्याने डावे बाजुला उभा करुन जेवणा करिता बसले असता तेवढ्याच भातकुली कडुन अमरावती कडे येणारा दुचाकीस्वार चालकाने त्याची ताब्यातील मोटार सायकल क्रंमाक एम.एच.डी.एफ ५२५९ होंडा शाईन ही भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन उभ्या असलेल्या ट्रक ला मागील बाजुने ठोस मारली. त्यामुळे त्याचे डोक्याला जबर मार लागला व खाली पडला व लोकांनी त्यास सामान्य रुग्णालय येथे इलाजकामी भर्ती केले असता डॉक्टरांनी मृत घोषीत केले.अश्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ अपघात :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | जखमीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोस्टे भातकुली अपनं 11/24 कलम 279,337 भा.द.वी | आसरा ते भातकुली कडे येणारा रस्ता ता. भातकुली जि. अमरावती | घटना.ता. वेळ. दि. 23/01/24 चे 08.10 वाजता. दाखल.ता. वेळ. दि. 23/01/24 चे19.02 वाजता. | किशोर श्रीराम भोजने वय 40 वर्ष रा. आसरा ता भातकुली | चारचाकी वाहनक्रं MH 27AR 6224 चा चालक | अंकुश विलास भोजने | हकीकत असा प्रकारे आहे की यातील फिर्यादी नामे किशोर श्रीराम भोजने रा. आसरा ता भातकुली यांनी पोस्टेला येवुन तक्रार दिली की माझे चुलत भाउ नामे अंकुश विलास भोजने हा आज रोजी सकाळी 08.10 वा. आसरा ते अमरावती कडे मोटर सायकल होंडाशाईनने कामाकरीता जात होता तरि काही वेळाने मला फोनव्दारे माहीती मिळाली की अंकुश यांना आसरा वरुन काही अंतरावर अमरावतीकडे अपघात झाला. तरी मी अपघात झालेल्या जागेवर गेलो असता मला अंकुश रोडच्या कडेला पडलेला दिसला. व त्याची गाडी पुर्ण फुटलेल्या अवस्थेत होती. त्या बाजुला MH 27AR 6224 क्रं असलेली मॅंक्सिको कार रोडच्या बाजुला समोरील काच फुटलेला दिसला. व त्याठीकाणी असेलेल्या लोकांनी माहीती दिली कि सदर चारचाकी वाहन फरार असुन व अंकुश (जख्मी) यांला खुप जास्त दुखापत झाल्या मुळे सावदेकर दवाखाना अमरावती येथे भरती करण्यात आले. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदर चा गुन्हा दाखल |

➢ ईतर :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो स्टे बडनेरा अप क्र ३२/२४ कलम ४२९ भादवी | ग्राम दाभा ओमकार पानठेला जवळ यवतमाळ रोडवर | दि.२०/०१/२० २४ वा चे रात्री २३/२५ वा दि.२३/०१/२० २४ चे १६/२४ वा | सपोनि सोनाली मेश्राम पोस्टे बडनेरा अम शहर | अज्ञात | हकीकत अशप्रकारे आहे की, यातील फि यांनी दि.२३/०१/२४रोजी अज्ञात इसमाविरुिध्द कलम ४२९ भादवी नुसार गुन्हा नोंद होण्याबाबत रिर्पोट दिला दि.२०/०१/२०२४ वा चे २१.०० वा ते ०८.०० वा पावेता डयुटी असतांना दि. २०.०१.२०२४ चे २३.२५ वा दरम्यान प्रदीप गोर्वधन सोळंके यांनी पो स्टै ला फोन करुन माहीती दिली की ग्राम दाभा ओमकार पानठेला जवळ यवतमाळ रोडवर अज्ञात इसमाने मांस टाकुन दिले आहे अशा माहीतीवरुन घटनास्थळी पोहोचेलो असता घटनास्थळावरुन २ नायलॉन कटटे दिसल्यावॄरुन पंचासमक्ष २ नॉयलॉन कटटयाची पाहणी केली असता सदर २ नायलॅन कटटयामध्ये जनावरांचे मास दिसुन आल्यावरुन कटयामधील मासापैकी काही मासांचे तुकडे सि ए परिक्षणकारीता तसेच पशुवैद्वकीय अधिकारी यांचे कडे तपासणी करीता एका प्लास्टीक बरीणीमध्ये वेगळे पंचासमक्ष काढण्यात आले सदर ठिकाणीपंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा करुन कारवाई करण्यात आली रात्रीचे वेळी पशु वैद्वयकीय अधिकारी उपलब्ध नसल्याने दि. २१.०१.२०२३ रोजी फोन केला असता सुटटी असल्याने ते उपलब्ध होवु शकले नाही आज दि. २३.०१.२०२४ रोजी पशुवैद्वयकीय आधिकारी श्री सोळंके पोस्टे बडनेरा हजर आले पशुवैद्वयकीय अधिकारी यांनी सदर बरणीतील मासांचे तपासणी करुन सदर मास सि ए परिक्षणकरीता दोन बरणीमध्ये सिलबंद करुन दिले तसेच सदर मासं जनावराचे असु शकते असे तोंडी सांगीतले यावरुन दि.२०.०१.२०२३ रोजी कोणीतरी अज्ञात इसमोन कुण्यातरी जनावराला ठार मारुन जनावराचे मास ग्राम दाभा ओमकार पानठेला जवळ यवतमाळ रोडवर टाकुन पळुन गेला म्हणुन अज्ञात इसमाविरुध्द कलम ४२९ भादवी प्रमाणे दि.२३/०१/२०२४ चे १६/२४ वा सदरचा गुन्हा दाखल |

➢ जुगार रेड :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | फ्रेजरपुरा अमरावती शहर | पो. स्टे. फ्रेजरपुरा, अप. क्र. ६५/२०२४ कलम १२ अ म जु का | लुंबीनी नगर, अमरावती | दि.२३/०१/ २०२४ चे १२/४५ वा. | दि.२३/० १/२०२ ४ चे १७/३८ वा. | सरतर्फे पोहेकाँ. योगेश श्रीवास ब. न.१०१५ वय ५५ वर्ष रा. पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | उत्तम गणपतराव पाळेकर वय ६५ वर्ष रा. लुंबीनी नगर, अमरावती | हकीकत अश्या प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे पो स्टे हद्दीत पो स्टॉफ सह पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की यातील आरोपी हा नमुद घटना ता वेळी व ठिकाणी लोकाकडुन पैशे घेवुन वरली मटका नवाचे जुगार खेळुन हारजितचा खेळ खेळत आहे. अश्या माहीती वरुन नमुद आरोपी यांचेवर जुगार रेड केली असता त्याच्या ताब्यातुन वरली मटका आकडे लिहलेली १ चिठ्ठी ,एक बॉलपेन निळया रंगाचा कि.अ.०५/- रु. व नगदी ११३०/- रु. असा एकुण ११३५/- रुपयाचा जुगार माल पंचासमक्ष जप्त करण्यात आला. गुन्हा दाखल |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | नागपुरी गेट | अप नं. २४/२०२४ कलम १२ अ म जु का | ॲकॅडमीक स्कुल च्या मागे भिंती जवळ मोकळया जागेत अमरावती | दि.२३.०१.२०२४ चे १५.३०वा ते १६.१५ वा दरम्यान | दि. २३.०१.२०२४ चे १६.३४ वा | ए एस आय महेन्द्रसिंग येवतीकर ब न ८०४ पो स्टे नागपुरी गेट अमरावती | १.विशाल गणेशराव हिवसे वय ४० वर्ष रा रेल्वे स्टेशन चिचफैल गल्ली नं ३ अमरावती २.विक्की प्रभु तुंडलायत वय ३७ वर्ष रा बेलपुरा अमरावती ३.राहुन मोहन डेहनवाल वय ३२ वर्ष रा बेलपुरा अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील फिर्यादी ए एस आय महेन्दग्रसिंग येवतीकर ब न ८०४ हे पो स्टे ला हजर असतांना त्यांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीलायक माहिती मिळाली कि, रतनगंज झोपडपट्‌टी जवळ खंडयाचे घरामागे नाल्याच्या काठावर मोकळया जागेत काही इसम वरली मटक्याचा पैशाचा आकडे लावुन जुगार खेळ खेळत व खेळवित आहे.अशा महिती वरून व पोलीस स्टाफ पंचासह पो सटे सा ना क्र २२ध२४ वेळ १५ध२१ वाजता खाजगी वाहनाने रतनगंज झोपडपट्‌टी जवळ खंडयाचे घरामागे नाल्याच्या काठावर मोकळया जागेत जावुन वरली मटकाची जुगार रेड केली असता तिथे नमुद तिन आरोपी हे वरली मटकाचा जुगार खेळ पैसे लावुन खेळत असतांना दिसले त्यांना जागीच पकडले त्यांचे जवळुन नगदी २००० रू.व १० रू डॉट पेन , वरली मटका आकडे लिहीलेल्या चिठ्‌ठया असा एकुण २०१० रू चा माल मिळुन आल्याने पंचासमक्ष जप्त करण्यात आला अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

➢ मर्ग -

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | घटना ता वेळ दाखल ता वेळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे. नांदगाव पेठ मर्ग क्र.०६/२४ कलम १७४ जा.फौ. | ईर्विन दवाखाना अमरावती | -- | निर्मल महादेव महल्ले वय ४० वर्षे रा. बिझ ीलॅन्ड मार्केट सिता साडी सेंटर नांदगाव पेठ ता.जि. अमरावती | लक्ष्मण पंढरीनाथ धुरी वय २७ वर्षे रा. सिता साडी सेंटर बिझीलॅन्ड नांदगाव पेठ ता.जि. अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि यातील फि. ला मृतक याने सांगीतले की त्याला श्वास घेण्यास त्रास होत आहे. वरुन त्यास ईर्विन दवाखाना अमरावती येथे ईलाजा करीता नेले असता तेथील डॉ. सा. यांनी सांगीतले कि मृतक हा हार्ट अटॅक ने मरण पावला आहे. अशा फि. चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा मर्ग दाखल करुन तपासात घेतला. |